# राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in





जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसुचना/ ७४० /२०२६ दि. २७/०७/२०२६

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन झोन – १ कार्यालय समोर रोड वर जिल्हा अधिकारी कार्यालय येथे गावदेवी चॅरिटेबल शेतकरी संघटनेच्या मार्फत प्रकल्प बाधित शेतकरी समितीच्या सहकार्याने चलो ठाणे मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले असुन मोर्चामध्ये मोठया प्रमाणात जनसमुदाय सहभागी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** टेंभी नाका येथुन कोर्टनाक्याकडुन किकनाका, कळवा, नवीमुंबई कडे हॉटेल पव्हेलीयन कडुन झोन १ कार्यालय रोड ने जाणाऱ्या सर्व वाहनांना **कोर्टनाका चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदरची वाहने कोर्टनाका येथुन उजवे वळण घेवुन पोलीस स्कुल येथुन डावे वळण घेवुन पारीख कट मागे इच्छित स्थळी वाहने जातील.

**ब)** सदरची वाहने कोर्टनाका येथुन डावे वळण घेवुन जी.पी.ओ. मार्गे इच्छित स्थळी वाहने जातील.

**सदरची अधिसुचना दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. पासून सायंकाळी १८:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदरची वाहतुक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

( **पंकज शिरसाट** )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे,

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी.नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, वाहतूक उपविभाग ठाणे.